D:\Ghase Date-04-05-2015\kalam 88 new.doc154

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी आदेश

३०८६ जा.क्र.जिउनि/कात-६/चासकाप्रभु को.ऑप.क्रे.सो./का.क.८८/अंशत: बदल/सन २०१८
जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग, जि.रायगड
यांचे कार्यालय, दिनांक :- ३१/१/२०१८

वाचले :- १) श्री.ए.के.शिंदे, उपलेखापरिक्षक, सहकारी संस्था, रोहा यांचेकडील या कार्यालयास दि.२०/३/२०१७ रोजी प्राप्त झालेला सन २०१२ ते २०१५ या वर्षाचा फेरलेखापरिक्षण अहवाल.
२) श्री.ए.के.शिंदे, उपलेखापरिक्षक, सहकारी संस्था, रोहा यांचेकडील या कार्यालयास दि.२०/३/२०१७ रोजी प्राप्तझालेला सन २०१२ त २०१५ या वर्षाचा विशेष लेखापरिक्षण अहवाल.
३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतूद.
४) या कार्यालयाकडील आदेश क्र.जिउनि/कात-६/चांसकाप्रभु को.ऑप.क्रे.सो/का.क.८८/सन २०१७, दि.७/६/२०१७ .

ज्या अर्थी चांद्रसेनिय कायस्थ प्रभु को.ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., मुरुड, ता.मुरुड,जि.रायगड या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या अंतर्गत नियम १९६१ अन्वये करण्यात आलेली असून संस्थेचा नोंदणी क्रमांक १२७८५/ दिनांक २६/२/१९४९ असा असून ती या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येते आणि,

ज्या अर्थी या कार्यालयाने वाचले क्र.१ व २ च्या अनुषंगाने चौकशी करणे आवश्यक असल्याने वाचले क्र.४ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ नुसार श्री.विठ्ठल सुर्यवंशी, सहय्यक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांची चौकशी कामी प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली होती. आणि,

ज्या अर्थी श्री.विठ्ठल सुर्यवंशी, प्राधिकृत चौकशी अधिकारी, चांद्रसेनिय कायस्थ प्रभु को.ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., मुरुड,ता.मुरुड ,जि.रायगड तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांची सहकार , पणन व वस्त्रोदयोग विभाग यांचेकडील शासन आदेश क्र.सहक-१२१७/प्र.क्र.४८४/१२-स , दिनांक ०९ जानेवारी २०१८ अन्वये प्रशासकीय कारणास्तव वडगांव मावळ येथे बदली झालेली आहे. आणि,

ज्या अर्थी श्री.सुर्यवंशी, प्राधिकृत अधिकारी यांची बदली झाल्यामुळे संस्थेच्या चौकशीचे कामकाज करणेकरिता अन्य प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

त्या अर्थी खालिलप्रमाणे आदेश देत आहे.

आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, पी.एम.खोडका, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, रायगड- अलिबाग, चांद्रसेनिय कायस्थ प्रभु को.ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., मुरुड, ता.मुरुड, जि.रायगड या संस्थेत दिनांक १/४/२०१२ ते ३१/३/२०१५ या कालावधीत झालेल्या रक्कमेच्या आर्थिक नुकसानीस संस्थेचे तत्कालीन संचालक व तत्कालीन कार्यालय प्रमुख/कर्मचारी यापैकी कोण कोण जबाबदार आहेत. व ते किती रक्कमेला जबाबदार आहेत हे निश्चित करुन त्या रक्कमा वसुली संबंधी आवश्यक ते आदेश देण्यासाठी वाचले क्र.४ मध्ये अंशतः बदल करुन सदर चौकशी कामी श्री.विठ्ठल सुर्यवंशी , सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुरुड (अतिरिक्त पदभार) यांचे ऐवजी श्री. एस्.एस्.मोरे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुरुड (अतिरिक्त पदभार) यांना चौकशीकामी प्राधिकृत करीत आहे.

(पी.एम.खोडका)
जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, रायगड-अलिबाग.

प्रति,

१. श्री.एस्.एस्.मोरे, प्राधिकृत चौकशी अधिकारी, चांद्रसेनिय कायस्थ प्रभु कोऑप.क्रेडिट सोसायटी लि., मुरुड, ता.मुरुड, जि.रायगड तथा सहाय्यक निबंधक, सकारी संस्था, मुरुड (अतिरिक्त पदभार).

२/- आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त आदेशातील मुदयांची कलम ८८ अंतर्गत चौकशी करुन चौकशी अहवाल या कार्यालयास लवकरात लवकर ~~या कार्यालयास~~ सादर करावा.

२. श्री.विठ्ठल सुर्यवंशी , सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वडगांव मावळ.

उपरोक्त संस्थेचे चौकशी कामी उपलब्ध केलेले कागदपत्रांचा ताबा तत्कालीन प्राधिकृत चौकशी अधिकारी यांचेकडे सुपूर्द करण्यांत यावा.

जिल्हा उप निबंधक
सहकारी संस्था रायगड, अलिबाग

का.क्र. उ.नि.(प्र.)

D:\Ghase Date-04-05-2015\kalam 88.doc107

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी आदेश

जा.क्र.जिउनि/कात-६/चासेकाप्रभु को.ऑप.क्र.सो../का.क.८८/सन २०१७
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग,जि.रायगड
यांचे कार्यालय, दिनांक :- ७/०६/२०१७.

वाचले :- १) श्री.ए.के.शिंदे, उपलेखापरिक्षक, सहकारी संस्था, रोहा,. यांचेकडील या कार्यालयास दि.२०/३/२०१७ रोजी प्राप्त झालेला सन २०१२ ते २०१५ या वर्षाचा फेर लेखापरिक्षण अहवाल.

२) श्री.ए.के.शिंदे, उपलेखापरिक्षक, सहकारी संस्था, रोहा,. यांचेकडील या कार्यालयास दि.२०/३/२०१७ रोजी प्राप्त झालेला सन २०१२ ते २०१५ या वर्षाचा विशेष लेखापरिक्षण अहवाल.

३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतूद.

ज्याअर्थी चांद्रसेनिय कायस्थ प्रभु को.ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लि., मुरुड ,ता.मुरुड, जिल्हा रायगड या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या अंतर्गत नियम १९६१ अन्वये नोंदणीकृत करण्यांत आलेली असून संस्थेचा नोंदणी क्रमांक १२७८५/, दिनांक २६/०२/१९४९ असा असून ती या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येते आणि,

ज्याअर्थी संस्थेचे लेखापरिक्षक यांनी वाचले क्र.१ प्रमाणे संस्थेचे दिनांक १/४/२०१२ ते ३१/३/२०१५ या मुदतीत गंभीर व संशयित दोष फेरलेखापरिक्षणा अंती दिसून येतात त्यामुळे वाचले क्र.२ नुसार फेरलेखापरिक्षण अहवालात नमूद केलेले गंभीर दोषा बाबतचा प्रशासकिय विशेष लेखापरिक्षण अहवाल (विशेष अहवाल) सोबत जोडला आहे. सदर अहवालात नमूद केलेल्या दोषांनुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ अन्वये योग्य ती कायदेशीर कारवाई करणे गरजेचे असल्याचे लेखापरिक्षक यांनी अहवालात नमूद केले आहे. सदर संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीस तत्कालीन संचालक व तत्कालीन कार्यालय प्रमुख जबाबदार आहेत आणि,

ज्याअर्थी संस्थेचे तत्कालीन संचालक मंडळ व तत्कालीन कार्यालय प्रमुख /कर्मचारी संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असल्याने सदर आर्थिक नुकसानीस जबाबदार असणा-या व्यक्तींकडून रक्कम वसुल करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये प्राधिकृत अधिका-यामार्फत चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याची तरतूद आहे आणि माझी अशी खात्री झाली आहे की, सदर तरतुदीप्रमाणे कारवाई करुन संस्थेला झालेल्या आर्थिक नुकसानीची रक्कम निश्चित करुन ती रक्कम संबंधीतांकडून वसुल करणे आवश्यक असल्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

D:\Ghase Date-04-05-2015\kalam 88.doc108

# आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, पी.एम.खोडका, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग चांद्रसेनिय कायस्थ प्रभु को.ऑपरेटीव्ह क्रेडिंट सोसायटी लि., मुरुड ,ता.मुरुड, जिल्हा रायगड या संस्थेत दिनांक १/४/२०१२ ते ३१/३/२०१५ या कालावधीत झालेल्या रक्कमेच्या आर्थिक नुकसानीस संस्थेचे तत्कालीन संचालक व तत्कालीन कार्यालय प्रमुख /कर्मचारी यापैकी कोण कोण जबाबदार आहेत. आणि जबाबदार असणा-या व्यक्तींकडून संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीची रक्कम व्याजासह वसुल करण्यासाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतुदीनुसार वाचले क्र. १ ते २ मधील अहवालातील मुदयांवर चौकशी करण्यांत यावी असे मी आदेश देत आहे.

सदर चौकशीसाठी श्री.विठ्ठल सुर्यवंशी, सहाय्यकनिबंधक, सहकारी संस्था,अलिबाग,ता. अलिबाग, जि.रायगड यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या खालील नियमानुसार चौकशी करुन अपहारीत रक्कम व अपहारीत रक्कमेमुळे संस्थेला झालेल्या नुकसानीस कोण कोण जबाबदार आहेत? व ते किती रक्कमेला जबाबदार आहेत? हे निश्चित करुन त्या रक्कमा वसुली सबंधी आवश्यक ते आदेश दयावेत.

प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी चौकशी खर्चाची जबाबदारी निश्चत करावी व हा खर्च फी म्हणुन वसुली करण्यासंबंधी आवश्यक ते आदेश दयावेत. तसेच प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी सदरची चौकशी खर्चाची जबाबदारी निश्चित करुन हा खर्च कोणाकडून वसुल करण्यांत यावा या बाबतचे आदेश दयावेत. प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी या आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांत चौकशी पूर्ण करावी.

हा आदेश माझे सही व कार्यालयीन मुद्रेनिशी आज दि. ७/६/२०१७ रोजी दिला आहे.

सोबत :- लेखापरिक्षण अहवाल व प्रशासकीय विशेष अहवाल

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड-अलिबाग

( पी.एम.खोडका )
जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, रायगड-अलिबाग.

प्रति,

१. श्री. विठ्ठल सुर्यवंशी, प्राधिकृत चौकशी अधिकारी, चांद्रसेनिय कायस्थ प्रभु को.ऑपरेटीव्ह क्रेडिंट सोसायटी लि., मुरुड ,ता.मुरुड, जिल्हा रायगड जि.रायगड तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,अलिबाग,ता.अलिबाग, जि.रायगड.

२.व्यवस्थापक, चांद्रसेनिय कायस्थ प्रभु को.ऑपरेटीव्ह क्रेडिंट सोसायटी लि., मुरुड ,ता.मुरुड, जिल्हा रायगड

३. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुरुड, ता. मुरुड, जि.रायगड.

जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, रायगड-अलिबाग.